गोपीनाथ मुंडे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - गोमुंअ-२०२६/प्र.क्र.१३०/का. ११ ए, (ई- १६८३९०७)**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : १० सप्टेंबर, २०२६.**

वाचा :-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. शेअवि-२०२०/प्र.क्र. ३३०/११ ए, दि. १९.०४.२०२३,
२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. कृआ/सां-९/गोमुंशेअसुसाअयो/मुदतवाढ/ २३४ R/२०२६, दि.१८.०५.२०२६.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र. १ येथील दि.१९.०४.२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर योजनेचा कालावधी आता संपुष्टात आला आहे. मागील तीन वर्षांत राबविण्यात आलेल्या योजनेच्या मूल्यमापनाअंती योजना अधिक परिणामकारकरित्या आणि पारदर्शक पध्दतीने राबविण्याच्या दृष्टीने सदर योजनेच्या स्वरुपात कालानुरुप काही बदल करणे व सदर योजनेची व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे.

यापूर्वी राबविण्यात आलेली “गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना” ही केवळ ७/१२ वर नाव असलेल्या खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीसाठी, अशा एकूण २ व्यक्तीसाठी लागू होती. राज्यात शेती व्यवसायामध्ये प्रत्यक्ष राबणाऱ्या भूमिहीन शेतमजूरांचा वाटा मोठा असून, कामाच्या ठिकाणी त्यांनाही अपघाताचा धोका असतो. भूमिहीन शेतमजूराचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास, त्याच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते. ही बाब विचारात घेता, या योजनेचे संरक्षण भूमिहीन शेतमजूरांनाही देणे आवश्यक आहे. याखेरीज, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत “महिला शेतकरी” म्हणून प्रमाणपत्र मिळालेल्या महिला शेतकऱ्यांचा देखील या योजनेच्या लाभकक्षेत अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

याशिवाय, पूर्वीची योजना वहितीधारक खातेदार शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका सदस्यांसाठी (आई/वडील, शेतकऱ्याची पत्नी/पती, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी १० ते ७५ वयोगटातील कोणतीही एक व्यक्ती), अशा एकूण दोन व्यक्तींसाठी राबविण्यात येत होती.

शेतकऱ्यासोबत त्यांच्या कुटुंबातील सदस्यही शेतीमध्ये काम करीत असतात. त्यामुळे वहितीधारक खातेदार शेतकऱ्यासह, त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य, त्याचप्रमाणे, भूमिहीन शेतमजूर व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य, तसेच, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत “महिला शेतकरी” प्रमाणपत्र प्राप्त सर्व महिला शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य, या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

या पार्श्वभूमीवर, गेल्या तीन वर्षात राबविण्यात आलेल्या, "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेमध्ये" सुधारणा करुन, "गोपीनाथ मुंडे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना" दि.१ एप्रिल, २०२६ ते दि.३१ मार्च, २०३१ या कालावधीत नवीन स्वरुपात राबविण्यास मान्यता देण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## <u>शासन निर्णय :-</u>

शेती व्यवसाय करतांना होणाऱ्या विविध अपघातांमुळे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहीवेळा त्यांना अपघातांमुळे अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे, त्याचा मृत्यू झाल्यास अथवा त्यास कायमचे अपंगत्व आल्यास, कुटुंबाच्या उपजिविकेच्या साधनावर विपरित परिणाम होऊन संपूर्ण कुटुंब आर्थिक विवंचनेत सापडते. अशा अपघातग्रस्त शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी यांना, सानुग्रह अनुदान देण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील आई-वडील, पती/पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी, घटस्फोटीत मुलगी व विधवा मुलगी अशा १० ते ७५ वर्ष वयोगटातील सर्व सदस्यांना या योजनेत समाविष्ट करण्यात येत असून, त्यांच्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना" **दि. १ एप्रिल, २०२६ ते दि.३१ मार्च, २०३१ या ५ वर्षाच्या कालावधीत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

### (I) <u>योजनेचे लाभार्थी :-</u>

(अ) सदर योजनेंतर्गत राज्यातील वहितीधारक खातेदार शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील आई-वडील, पती/पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी, घटस्फोटीत मुलगी, विधवा मुलगी यापैकी कोणत्याही व्यक्तिचा अपघात होऊन अपंगत्व आल्यास किंवा त्यांचा मृत्यू झाल्यास, संबंधित शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी किंवा त्यांचे कायदेशीर वारसदार सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र असतील.

(आ) <u>योजनेंतर्गत कायदेशीर वारसदारांची निवड अनुक्रमे पुढीलप्रमाणे करण्यात येईल :-</u>

(१) अपघातग्रस्तांचे पती / पत्नी,
(२) अपघातग्रस्तांची अविवाहित मुलगी,
(३) अपघातग्रस्तांची आई,
(४) अपघातग्रस्तांचा मुलगा,
(५) अपघातग्रस्तांचे वडील,
(६) अपघातग्रस्तांची सून,
(७) अपघातग्रस्तांची घटस्फोटीत मुलगी / विधवा मुलगी,
(८) अन्य कायदेशीर वारसदार.

***टीप :- कायदेशीर वारसदार म्हणजे अशी व्यक्ती, जी लागू असलेल्या वारसा हक्क कायद्यानुसार, मृत व्यक्तीच्या मालमत्ता, हक्क आणि लाभांचा वारसा मिळवण्यास पात्र असते; यामध्ये संबंधित कायदे किंवा योजनेच्या तरतुदींना अधीन राहून, मृत व्यक्तीच्या मृत्यूमुळे देय असलेल्या कोणत्याही भरपाईचा/नुकसान भरपाईचाही समावेश होतो.***

**(II) योजनेंतर्गत सानुग्रह अनुदानाची अनुज्ञेय मर्यादा :-**

(अ)

| अ.क्र. | अपघाताची बाब | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रु.२,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी होणे | रु.२,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी होणे | रु.२,००,०००/- |
| ४ | अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी होणे | रु.१,००,०००/- |

**(ब)** सदर योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास, सदर लाभार्थी गोपीनाथ मुंडे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभास पात्र ठरणार नाहीत. उदा. ऊसतोड कामगारांकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनेच्या लाभ घेतलेल्या व्यक्ती.

**(III) योजनेचा लाभ देण्यासाठी अनुज्ञेय अपघातांचे स्वरुप :-**

योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र ठरण्यासाठी खालील अपघात ग्राह्य धरण्यात येतील :-

(१) रस्ता/रेल्वे अपघात,
(२) पाण्यात बुडून मृत्यू,
(३) जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा,
(४) वीजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात,
(५) वीज पडून मृत्यू,
(६) खून,
(७) उंचावरुन पडून मृत्यू,
(८) सर्पदंश व विंचूदंश,
(९) नक्षलवाद्यांकडून झालेली हत्या,
(१०) जनावरांच्या हल्ल्यामुळे जखमी/ मृत्यू,
(११) बाळंतपणातील मृत्यू,
(१२) दंगलीतील मृत्यू/अपंगत्व,
(१३) आकस्मिक अपघातामुळे झालेला अंतर्गत रक्तस्त्राव,
(१४) उष्माघात.

**(IV) योजनेचा लाभ अनुज्ञेय नसलेल्या अपघातांचे स्वरुप :-**

(१) नैसर्गिक मृत्यू,

(२) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या / जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे,

(३) युध्द,

(४) सैन्यातील नोकरी,

(५) जवळच्या लाभधारक (पती/पत्नी/१८ वर्षाखालील मुलगा/मुलगी, अविवाहित मुलगा/मुलगी व आई/वडील, इत्यादी) यांचेकडून खून

(६) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात,

(७) वयोगट १०-१८ वर्षे दरम्यान वाहन चालवत असताना झालेला अपघात,

(८) अंमली पदार्थाच्या अमलाखाली असतांना झालेला अपघात,

(९) मोटार शर्यतीतील अपघात.

## <u>(V) योजनेचा लाभ मिळण्यासाठी सादर करावयाची प्रमाणपत्रे :-</u>

### (अ) <u>वहितीधारक शेतकरी:-</u>

(i) ७/१२ उतारा /ॲग्रीस्टॅक अंतर्गत प्राप्त शेतकरी ओळखपत्र,

(ii) मृत्यूचा दाखला,

(iii) संबंधित तलाठ्याकडील “गाव नमुना ६ क” नुसार शेतकरी यांचे वारस म्हणून मंजूर झालेली वारसाची नोंद,

(iv) वहितीधारक शेतकरी यांच्या वयाच्या पडताळणी करिता, शाळा सोडल्याचा दाखला/ आधारकार्ड/निवडणूक ओळखपत्र, ज्या कागदपत्राआधारे ओळख/वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे.

### (आ) <u>भूमिहीन शेतमजूर :-</u>

(i) आधार कार्ड,

(ii) रहिवाशी दाखला,

(iii) एका वर्षाच्या आत, असंघटित कामगार पोर्टल (e-Shram) वरील भूमिहीन शेतमजूर म्हणून नोंदणी आवश्यक,

(iv) मृत्यूचा दाखला.

### (इ) <u>महिला शेतकरी :-</u>

(i) महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत “महिला शेतकरी” म्हणून प्राप्त प्रमाणपत्र,

(ii) मृत्यूचा दाखला,

(iii) आधार कार्ड,

(iv) रहिवाशी दाखला.

## (VI) अपघाताच्या स्वरुपानुसार सानुग्रह अनुदान मिळण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे :-

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | बंधनकारक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | रस्ता/रेल्वे अपघात | इन्क़्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल, वाहन चालविताना अपघात झाल्यास, त्याबाबत मोटार वाहन परवाना (केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम ३ पोट कलम १ नुसार बंधनकारक आहे.) |
| २ | पाण्यामध्ये बुडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल, बुडून बेपत्ता झाल्यास, फक्त प्रथम माहिती अहवाल व क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक. |
| ३ | जंतूनाशके अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल व रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल). |
| ४ | वीजेचा धक्का अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा व शरीर विच्छेदन अहवाल |
| ५ | वीज पडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा व शरीर विच्छेदन अहवाल. |
| ६ | खून | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल) व दोषारोप पत्र. |
| ७ | उंचावरून पडून झालेला मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल व पोलिस तपासणी अंतिम अहवाल. |
| ८ | सर्पदंश/ विंचूदंश | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल, वैद्यकीय उपचारापूर्वीच मृत्यू झाल्यास, शरीर विच्छेदन अहवालातून सूट देण्यात येईल. तथापि, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, शासकीय आरोग्य केंद्र अधिकाऱ्यांकडून प्रतिस्वाक्षरीत असणे आवश्यक. |
| ९ | नक्षलवाद्याकडून हत्या | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल व नक्षलवादी हत्येसंदर्भातील कार्यालयीन कागदपत्रे. |
| १० | **जनावरांच्या हल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी / मृत्यू** | |
| | अ) जनावरांच्या चावण्यामुळे रेबीज होऊन मृत्यू | वैद्यकीय औषधोपचाराची कागदपत्रे. |
| | ब) जखमी होऊन मृत्यू<br>क) जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू होऊन शव न मिळणे | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल व क्षतीपूर्ती बंधपत्र. |
| ११ | बाळंतपणातील मृत्यू | बाळंतपणात मृत्यू झाला असल्याबाबत, शासकीय आरोग्य केंद्र अधिकाऱ्यांकडून प्रतिस्वाक्षरीत केलेले वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र. |
| १२ | दंगलीतील मृत्यू/अपंगत्व | इन्क्वेस्ट पंचनामा, शरीर विच्छेदन अहवाल व दंगलीबाबतची कार्यालयीन कागदपत्रे. |
| १३ | आकस्मिक अपघातामुळे झालेला अंतर्गत रक्तस्त्राव | इन्क्वेस्ट पंचनामा (शरीर विच्छेदन अहवाल आवश्यकतेनुसार) आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | निकषांनुसार अंतर्गत रक्तस्त्रावाच्या बाबतीत, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र. |
| १४ | उष्माघात | शरीर विच्छेदन अहवाल व सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केलेल्या निकषांनुसार उष्माघाताच्या बाबतीत, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र. |
| १५ | अपंगत्वाच्या लाभाच्या पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | १) अपंगत्व अथवा अवयव निकामी झाले असल्याचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र अथवा दवाखान्याच्या नोंदी.<br>२) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/ जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र. |

**टीप** :- १) वरील कागदपत्रे मूळ किंवा राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेली ग्राह्य धरण्यात येतील.
२) मृत्यू कारणांची नोंद सक्षम प्राधिकाऱ्यांने स्पष्ट केली असल्यास, रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल) या कागदपत्राची आवश्यकता राहणार नाही.

## (VII) योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती :-

(i) अपघातग्रस्त शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांच्या अपघाताबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाल्यानंतर सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने प्रत्यक्ष भेट देवून, त्याची सखोल तपासणी करून त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसीलदार यांना घटना झाल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करावा.

(ii) जेव्हा शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या अपघाताचे प्रकरण निदर्शनास येईल, तेव्हा संबंधित अपघातग्रस्त शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी यांचे वारसदार यांनी सर्व निर्धारित कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे ०२ महिन्यांच्या आत सादर करावा. याकरिता कृषि विभागाचे सर्व क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी संबंधितांना मार्गदर्शन करतील.

(iii) या विहित मुदतीत अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वाढ करावयाची झाल्यास, सदर मुदत वाढविण्याबाबत, संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना विवेकाधीन निर्णय घेण्याचे अधिकार असतील.

(iv) संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन पात्र असलेले परिपूर्ण प्रस्ताव संबंधित तहसीलदार यांच्याकडे सादर करावेत.

(v) संबंधित तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीमध्ये ३० दिवसांच्या आत संबंधित शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अथवा त्यांच्या कुटुंबातील वारसदारांना योजनेचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

(vi) सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. योजनेच्या अंमलबजावणीचा आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्रैमासिक आढावा घेऊन, त्याबाबतचा प्रगती अहवाल शासनास सादर करावा.

(vii) गोपीनाथ मुंडे शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत, दरवर्षी मंजूर दाव्यांच्या संख्येनुसार, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(viii) "गोपीनाथ मुंडे शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेची" अंमलबजावणी काटेकोरपणे करुन वित्तीय शिस्तीचे पालन करण्याच्या दृष्टीने या योजनेचा लाभ, लाभार्थ्यांच्या बँक खात्यात, थेट लाभ हस्तांतरण (D.B.T.) च्या माध्यमातून प्रकरणपरत्वे संबंधित अपघातग्रस्त शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अथवा त्यांच्या वारसदारांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

(ix) योजना अधिक परिणामकारक आणि लाभार्थी केंद्रित करण्याच्या दृष्टीने डेटाची अचूकता, सुलभ उपलब्धता व सुरक्षितता आणि योजनेच्या फलनिष्पतीच्या, रियल टाईम विश्लेषणासाठी "Integrated Online Portal" कार्यान्वित करण्यात येईल.

(x) योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्या-त्या आर्थिक वर्षात वितरीत करावयाच्या निधीमधून ३ टक्के रक्कम प्रशासकीय खर्चासह आवश्यकतेनुसार वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांनुसार बाह्यस्थ संस्थेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळाच्या खर्चासाठी असेल.

**<u>(VII) योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यासाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावरील समित्या, त्यांची रचना व कार्ये :-</u>**

**<u>अ) तालुकास्तरीय समिती :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | संबंधित तहसीलदार | अध्यक्ष |
| २) | गट विकास अधिकारी (पंचायत समिती) | सदस्य |
| ३) | वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पोलीस) | सदस्य |
| ४) | जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) | तालुका कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**<u>तालुकास्तरीय समितीची कार्ये :-</u>**

१. योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन प्राप्त प्रस्तावांना मान्यता देणे,
२. सानुग्रह अनुदानाच्या प्रस्तावातील कागदपत्रांच्या त्रुटी पूर्ततेसाठी संबंधित यंत्रणांना सूचना देणे,
३. योजनेशी संबंधित प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे व प्रतिमाह बैठका घेणे,
४. आवश्यकतेनुसार तक्रारींची पडताळणी करुन जिल्हास्तरीय समितीस शिफारस करणे.

**<u>ब) जिल्हास्तरीय समिती :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित अपर जिल्हाधिकारी | अध्यक्ष तथा अपिलीय अधिकारी |
| २ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३ | अतिरिक्त पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ४ | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ६ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ७ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समितीची कार्ये :-**

१. तालुकास्तरीय समितीने पारित केलेला निर्णय शेतकरी/ भूमिहीन शेतमजूर / महिला शेतकरी अथवा त्यांच्या वारसदारास मान्य नसल्यास, यासंदर्भात समाधानकारक तोडगा काढणे,
२. समितीच्या त्रैमासिक बैठकीत जिल्हयातील प्रकरणांचा आढावा घेणे,
३. योजनेंतर्गत लाभ अदा करण्याबाबत लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणांमध्ये वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत समाधानकारक तोडगा काढणे,
४. प्रलंबित प्रकरणांवरील कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी, संबंधित कागदपत्रे तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देणे.

**क) राज्यस्तरीय समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (कृषि) | अध्यक्ष |
| २ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (महसूल) | सदस्य |
| ३ | सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) | सदस्य |
| ४ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (नियोजन) | सदस्य |
| ५ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (गृह) | सदस्य |
| ६ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (वित्त) | सदस्य |
| ७ | सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (आरोग्य) | सदस्य |
| ८ | आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ९ | सहसचिव/उपसचिव (कृषि) | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समितीची कार्ये :-**

१. योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे,
२. योजनेच्या अंमलबजावणीवेळी येणाऱ्या विविध अडचणींच्या संदर्भात विचार विनिमय करुन निर्णय घेणे,
३. योजनेच्या अंमलबजावणीबाबत सहामाही आढावा घेणे.

२. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीसाठी कृषि आयुक्तालय स्तरावर आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” व सहाय्यक संचालक, लेखा-१, यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून, तसेच, जिल्हास्तरावर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना, “नियंत्रक अधिकारी” आणि संबंधित जिल्हयाचे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी यांना, “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणारा रु.२००.०० कोटी इतका खर्च खालील लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात येईल :-

**मागणी क्र. डी - ३,**

**२४०१ पीक संवर्धन,**

**(००) (०६) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (कार्यक्रम),**

**(२४०१ ४४२७) राज्य योजना - ३३ अर्थसहाय्य.**

४. प्रस्तुत शासन निर्णय, मा. मंत्रिमंडळाच्या दि.०४.०८.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार तसेच, नियोजन विभाग व वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे अनौसं. क्रमांक २१०/२०२६/का.१४३१, दि.१७.०७.२०२६ व अनौसं. क्रमांक ३७१/२०२६/व्यय-१, दि.०१.०९.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२६०९१०१५४६४१३०४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.09.10 15:47:50 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
८. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१०. मा.विधानमंडळ सदस्य (सर्व),
११. मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई,
१२. सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई,

१३. सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (वने), मंत्रालय, मुंबई,
१४. सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई,
१५. सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई,
१६. सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. सचिव/ प्रधान सचिव /अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई,
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
१९. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा), गृहविभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग), मंत्रालय, मुंबई,
२१. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. महासंचालक (माहिती व जनसंपर्क), मंत्रालय, मुंबई (५ प्रती ) प्रसिध्दीच्या विनंतीसह,
२३. विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर),
२४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२५. जिल्हाधिकारी (सर्व),
२६. कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (सर्व),
२७. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व),
२८. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२९. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व),
३०. उप विभागीय कृषि अधिकारी (सर्व),
३१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर,
३२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
३४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
३५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
३६. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३७. तहसीलदार (सर्व),
३८. तालुका कृषि अधिकारी (सर्व),
३९. निवडनस्ती (का. ११ ए).